# पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा

(बोरगाव पोलीस ठाणे)

फोन नं - ०२१६२ २६५२३३

ई-मेल- borgaonps.satara@mahapolice.gov.in


## प्रेस नोट दि 29/12/2025

## बोरगांव पोलीस ठाणे हददीतुन नागरिकांचे गहाळ झालेले एकुण - 3,81,000/- रु. किंमतीचे एकुण 22 मोबाईल मुळ मालकांना परत.

***************

बोरगांव पोलीस ठाणे हददीतुन नागरीकांचे मोबाईल गहाळ होण्याचे प्रमाण वाढल्याने मा. श्री. तुषार दोशी पोलीस अधीक्षक सातारा मा. श्रीमती वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा व मा. श्री राजीव नवले पोलीस उपविभागीय अधीकारी सातारा उपविभाग सातारा यांनी सहा. पोलीस निरीक्षक डी. एस. वाळवेकर बोरगांव पोलीस ठाणे यांना नागरीकांचे हरविलेले मोबाईल शोध घेणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक श्री डी. एस. वाळवेकर बोरगांव पोलीस ठाणे यांनी बोरगाव पोलीस ठाणेकडील पो. कॉ. केतन जाधव यांना सीईआर पोर्टल चा वापर करून नागरीकांचे हरविलेले मोबाईलचा शोध घेवुन तो नागरीकांना परत करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने बोरगांव पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार केतन जाधव व सोबत पोहवा जयवंत बुधावले पो कॉ. अभिषेक वाघमारे, पो कॉ. धनराज साळुंखे यांनी सीईआर पोर्टल व तांत्रीक माहीतीच्या आधारे राज्यातुन/ परराज्यातुन माहे- डिसेंबर 2025 मध्ये एकुण 3,81,000/- रु किंमतीचे 22 मोबाईल रिक्व्हर करुन ते नागरिकांचे ताब्यात दिलेले आहेत. सदरची मोहीम मा. श्री. तुषार दोशी पोलीस अधीक्षक सातारा मा. श्रीमती वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा व मा. श्री राजीव नवले पोलीस उपविभागीय अधीकारी सातारा उपविभाग सातारा यांचे मार्गदर्शनाखाली सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे बोरगांव पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. डी. एस. वाळवेकर यांनी सांगितले आहे. तसेच सन - 2025 मध्ये आतापर्यंत एकुण - 55 मोबाईल नागरिकांना परत करण्यात आलेले आहेत.

सदरची कारवाई ही बोरगांव पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक डी. एस. वाळवेकर व श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सुधीर भोसले यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा जयवंत बुधावले, पो. कॉ केतन जाधव, पो कॉ. अभिषेक वाघमारे, पो कॉ. धनराज साळुंखे व सायबर पोलीस ठाणे चे पो. कॉ. महेश पवार, पो. कॉ प्रशांत मोरे यांनी केलेली आहे.

---

प्रति-

मा. सर्व दैनिक संपादक

सातारा.